**कतारचे महामहिम अमीर औपचारिक भारत भेटीवर (17-18 फेब्रुवारी, 2025)**

15 फेब्रुवारी 2025

पंतप्रधान श्री.नरेंद्र मोदी यांच्या निमंत्रणावरुन कतारचे महामहिम अमीर शेख तमीम बिन हमद अल-थानी हे 17-18 फेब्रुवारी 2025 दरम्यान औपचारिक भारत भेटीवर असतील. त्यांच्या समवेत मंत्री, वरिष्ठ अधिकारी आणि उद्योगपतीच्या शिष्टमंडळासहित उच्च-स्तरीय शिष्टमंडळ देखील असेल. कतारचे महामहिम अमीर यांची ही औपचारिक दुसरी भारत भेट असेल. महामहिम यांनी यापूर्वी मार्च 2015 मध्ये भारताचा औपचारिक दौरा केला होता.

2. कतारचे महामहिम अमीर यांचे राष्ट्रपती भवन परिसरात 18 फेब्रुवारी 2025 रोजी समारंभपूर्वक स्वागत केले जाईल. भेटीदरम्यान, महामहिम अमीर हे आदरणीय राष्ट्रपती श्रीमती द्रौपदी मुर्मू यांच्यासोबत चर्चा करतील. तसेच राष्ट्रपतींच्या वतीने त्यांच्या सन्मानार्थ विशेष भोजन समारंभाचे आयोजन देखील केले जाईल. द्विपक्षीय संबंधांच्या विविध पैलूंवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याबरोबर महामहिम अमीर संवाद साधणार आहेत.

3. भारत आणि कतार यांच्यात मैत्री, विश्वास आणि परस्पर आदर यांवर आधारित ऐतिहासिक संबंध आहेत. गेल्या काही वर्षांत व्यापार, गुंतवणूक, ऊर्जा, तंत्रज्ञान, संस्कृती आणि नागरिक परस्पर संबंध यासारख्या क्षेत्रात दोन्ही देशांमधील संबंध मजबूत झाले आहेत. कतार मध्ये अन्य राष्ट्रीय नागरिकांच्या तुलनेत भारतीय नागरिकांची संख्या सर्वाधिक आहे. कतारची प्रगती व विकासात त्यांचे सकारात्मक योगदान नेहमी कौतुकाचा विषय ठरला आहे. महामहिम अमीर यांच्या भेटीमुळे भविष्यातील विस्तारीत बहुआयामी भागीदारीला आणखी चालना मिळेल.

नवी दिल्ली

15 फेब्रुवारी 2025